भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

( दुपार )

जा.क्र.२३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०४/२०१७

**१) रेल्वेने कटुन अनोळखी इसमाचा प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :—**

दिनांक ३१/०३/२०१७ चे १०.५५ वा. दरम्यान यातील डाऊन लाईन रेल्वे पुल क्र. किमी १०४६/१८—१६ मध्ये अनोळखी पुरुष वय अंदाजे ३० ते ४० वर्ष वयोगटातील इसमाचे रेल्वेने कटलेला अर्धा शरीर रेल्वे पुलीयावर व अर्धा शरीर पुलीयाचे खाली नदी मध्ये कटुन पडलेल्या मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी रामसहायक प्रजापती वय २३ वर्ष, ह. मु. मुडीकोंटा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहे.

**२) विष प्राशन करुन इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यु . :—**

दिनांक ३०/०३/२०१७ चे १३.५० वा. दरम्यान यातील मृतक जगदीश गणपत वडीचार वय ४५ वर्ष, रा. गोपेवाडा याने स्वत:चे घरी विष प्राषन करुन त्याची प्रकृती अत्यंतगंभिर अवस्थेत झाल्याने त्यास औषधोपचारा करीता लक्ष हॉस्पीटल भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. व्यास याचे पत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. किचक पास्टे जवाहरनगर येथे बयाना वरुन पोस्टे जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहे.

**३) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :—**

दिनांक ३१/०१/०१६ चे १८.२० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत एसटी डेपो समोर पवनी येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय पवनी येथे दारु पिल्याबाबतची एमएलसी अभीप्राय मिळाल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. रामटेके पवनी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पवनी येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पवनी हे करीत आहेत.

**४) दारूडया वाहन चालकावर कारवाई.** :—

दिनांक ३१/०१/०१६ चे १७.३० ते १८.०० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत एसटी डेपो समोर पवनी येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय पवनी येथे दारु पिल्याबाबतची एमएलसी केली असता मद्य प्राषण केल्याचा अभिप्राय अभीप्राय मिळाल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते पवनी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पवनी येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पवनी हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई.** :—

दिनांक ३१/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली १७७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०८, तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १५९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.